**<u>निशाणी क्र. ८० वरील आदेश</u>**

वादी याने प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीमधील तोडलेल्या झाडांची वनपाल देवगड यांनी मोजमापे घेवून, झाडांचा लिलाव करुन लिलावातून प्राप्त झालेली रक्कम न्यायालयात जमा होण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील अनाधिकाराने तोडलेली झाडे कोणासही विकू नये, वाहतूक करु नये इत्यादी दादीकरीता निशाण क्र. ५ ला तुर्तातुर्त मनााई अर्जाद्वारे वादीने विनंती केली होती. तसेच सदर झाडांची लांबी, रुंदी, उंची इत्यादीचा तपशिल न्यायालयासमोर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक होवून त्यांनी त्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी वादीने विनंती केली होती. त्याप्रमाणे न्यायालयीन आयुक्त विधिज्ञ यांनी दिनांक १९/४/२०१७ इ. रोजी दावा मिळकतीमध्ये भेट दिली असता सदर तोडलेली झाडे जंगलात व झाडी—झुडूपात असल्यामुळे त्याची मोजमापे घेता येवू शकत नाहीत असा अहवाल दिला आहे. सध्या पावसाळा सुरु होत आहे. सदर झाडे तशीच पडून राहिल्यास पावसामुळे कुजून जाणार आहेत. त्यामुळे सदरची झाडे सामाईक मिळकतीमधून तोडली असल्यामुळे वादी प्रतिवादींचे यापूर्वीच नुकसान झाले आहे. सदर झाडे कुजून गेल्यास उभय पक्षकारांचे आणखी नुकसान होणार आहे. अशा परिस्थितीत सदर नुकसान टाळण्याकरीता वनपाल देवगड यांनी सदर तोडलेल्या झाडांची गोलाई, उंची इत्यादी स्वरुपाची मोजमापे घेवून, सदर झाडांचा लिलाव करुन, सदर लिलावातून मिळणारी रक्कम न्यायालयात जमा करावी असा आदेश होणेबाबत प्रस्तुत वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ९४ ला सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार त्याने वनखात्याची पुर्व परवानगी घेवून त्यांच्या आदेशानुसार अटींचे पालन करुन त्याने सदरची झाडे तोडली आहेत. दावा मिळकतीमध्ये वादीचा अधिकार नाही. दावा मिळकतीमध्ये वादीचा हिस्सा असल्याबाबत त्याने कोणताही पुरावा सादर

केला नाही. सन १९७२ पासून दावा मिळकत प्रस्तुत प्रतिवादीच्या कब्जे वहिवाटीस आहे. त्यास वादीने कधीही हरकत घेतली नाही. सदर झाडांचा लिलाव करण्यास प्रस्तुत प्रतिवादीचा विरोध आहे. सदर लिलाव झाल्यास प्रस्तुत प्रतिवादीचे आर्थिक नुकसान होणार आहे. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, या कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा व प्रतिवादी क्र. १ चा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. निशाण क्र. ५ ला असलेल्या तुर्तातुर्त मनाई अर्जाच्या कारणमिमांसेमध्ये दावा मिळकतीमध्ये वादी याचा देखील हक्क व हिस्सा आहे असे प्रथमदर्शनी दिसून आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सदरची तोडलेली झाडे ही दावा मिळकतीमधील आहेत व ही झाडे देखील दावा विषय आहेत. निशाण क्र. ५ च्या अर्जावर प्रतिवादी क्र. १ याने दाव्याच्या अंतिम निकालापावेतो सदर झाडे कोणासही विकू नयेत अगर वाहतूक करु नये असा आदेश पारीत करण्यात आला आहे. निशाण क्र. २१ च्या अर्जावर न्यायालयीन आयुक्त विधिज्ञ श्री. आय.व्ही.ठाकूर यांना सदर झाडांची पाहणी करुन त्यांची मोजमापे घेवून अहवाल सादर करणेबाबत आदेश पारीत करण्यात आला होता. विधिज्ञ श्री. ठाकूर यांनी दाखल केलेल्या निशाण क्र. ७६ च्या अहवालामध्ये ते सदर झाडांची पाहणी करण्यास गेले असता, सदर झाडे जंगलामध्ये एक ते दिड किलोमिटर अंतरावर आहेत, त्या ठिकाणी जंगली रानटी झाडेझुडूपे काटेकूटे असलेली टेकडी आहे, त्या ठिकाणी रानटी झुडूपे, काटे, जंगली वेल, गवत भरलेले आहे, त्यामुळे सदर झाडांची मोजमापे घेणे अथवा तपासणी करणे शक्य झाले नाही, असे नमूद केले आहे.

५. सदर झाडे तोडलेली आहेत. त्यामुळे दाव्याच्या अंतिम

निकालापावेतो ती तशीच राहिल्यास ती कुजणार आहेत. त्यामुळे सदर झाडांची लिलावाद्वारे विक्री न केलेस उभय पक्षकारांचे निश्चितच नुकसान होणार आहे. दावा मिळकतीमध्ये वादी याचा हक्क व हिस्सा नाही असे दाव्याअंती शाबीत झाल्यास सदर झाडांची विक्री किंमत प्रतिवादी क्र. १ यालाच मिळणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर झाल्यास प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ याचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे वरील कारणास्तव वनपाल देवगड यांच्या द्वारे सदर झाडांची पाहणी होवून, लिलावाद्वारे विक्री करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## — <u>**आदेश**</u> —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वनपाल देवगड यांनी वादी, प्रतिवादी यांना पुर्वसुचना देवून त्यांच्या उपस्थितीत सदर झाडांची पाहणी करावी, त्यांनी सदर झाडांची उंची, गोलाई इत्यादी मोजमापे घ्यावीत, त्यांनी सदर झाडांची लिलावाद्वारे विक्री करावी, त्यांनी लिलावाद्वारे प्राप्त झालेली विक्री किंमत न्यायालयात जमा करावी व त्यांनी त्याबाबतचा पंचनामा व अहवाल याकामी न्यायालयात सादर करावा.

३. सदर लिलावाचा खर्च वादी याने करावयाचा आहे.

४. वादी याने वनपाल देवगड यांना आवश्यक ती कागदपत्रे पुरवावीत.

५. वादीने वरीलप्रमाणे पुर्तता केल्यानंतर वनपाल देवगड यांना येणेप्रमाणे पत्र पाठविण्यात यावे.

६. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक : १७/०६/२०१७

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.